सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

# जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,परभणी -431401

महाराणा प्रताप चौक, जिंतुर नाका, परभणी. दुरध्वनी क्र.02452-240503/240193
Email:-dietparbhani@maa.ac.in Web:-www.dietparbhani.in Email: prin.dietpbn@gmail.com

जा.क्र. जिशिवप्रसंप / शिक्षक स्पर्धा/2025/ दिनांक - 28 ऑक्टोबर 2025

प्रति
**1.मा.प्राचार्य,जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,( सर्व )**
**2.शिक्षणाधिकारी प्राथमिक जि.प.( सर्व )**
**3.शिक्षणाधिकारी माध्यमिक जि.प.( सर्व )**
**4.गटशिक्षणाधिकारी,पंचायत समिती( सर्व )**
**5.प्रशासन अधिकारी न.पा./म.न.पा.( सर्व )**

**विषय :- शिक्षक व अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी विविध स्पर्धाचे आयोजन करणेबाबत.**

**संदर्भ** :- 1.राष्ट्रीय शिक्षण धोरण-2020
2.राज्य अभ्यासक्रम आराखंडा 2024
3. शासननिर्णय क्र.संकीर्ण 2024/प्र.क्र.10/एसडी-6मंत्रालय मुंबई दि.15 मार्च 2024 ( SQAAF)
4.मा. संचालक रा.शै.सं. व प्र. परिषद महाराष्ट्र पुणे यांचे पत्र क्रमांक राशैसवप्रप/शिक्षक स्पर्धा/2025-2026 दिनांक -10/10/2025
5.मा. संचालक रा.शै.सं. व प्र. परिषद महाराष्ट्र पुणे यांचे दिनांक - 14/10/2025 रोजीच्या ऑनलाईन बैठकीतील सूचना

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये राज्यातील राज्य मंडाळाच्या अधिनस्त असणाऱ्या सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित, अंशता अनुदानित प्राथमिक/ माध्यमिक/उच्चमाध्यमिक शाळांमधील शिक्षक ,शिक्षकेत्तर कर्मचारी , शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी, कर्मचारी यांच्या मध्ये शैक्षणिक, प्रशासकीय कौशल्य वृध्दींगत करणे, त्यांच्यात समन्वय, सहकार्य व स्पर्धात्मकतेची भावना निर्माण करणे तसेच त्यांच्या डिजीटल, भाषिक व सादरीकरण कौशल्यांना चालना देण्याच्या उददेशाने तालुका, विभाग व राज्य स्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन शैक्षणिक वर्ष 2025-2026 पासून करण्यात येत आहे.

या स्पर्धांच्या आयोजनासाठी निकष आणि नियमावली तयार करण्यात आली आहे. सदर स्पर्धा एकूण 42 विषयावर अधारित असणार आहेत. नमूद स्पर्धांचे निकष व नियमावली या बाबतची सविस्तर माहिती शिक्षक व अधिकरी, कर्मचारी स्पर्धा मार्गदर्शिक या पुस्तिकेत देण्यात आलेली आहे.शिक्षक,अधिकारी व कर्मचारी यांनी सदर पुस्तिकेत देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करावे.सदर पुस्तिका ही राज्य शैक्षणीक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र पुणे या संस्थेच्या www.maa.ac.in या संकेतस्थळावर उपयुक्त या टॅबवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

वरील नियोजनानुसार सन-2025-26 या वर्षापासुन एकुण 42 स्पर्धाचे आयोजन राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र पुणे यांच्या निर्देशानुसार राज्यातील सर्व डायटकडुन करण्यात येणार आहे.याबाबत संबंधित डायटकडुन मार्गदर्शन सूचना पत्र दिले जाणार आहे.त्यानुसार तालुकास्तरावर स्पर्धाचे आयोजन करावयाचे आहे.

वरील 42 स्पर्धापैकी **पोर्स्टस बनवणे** या स्पर्धेच्या राज्यस्तरीय आयोजनाची जबाबदारी **जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,परभणी** यांचेकडे देण्यात आलेली आहे.त्यानुसार सदर स्पर्धा आयोजनाबाबतच्या सूचना खालील प्रमाणे आहेत.

1.सदर स्पर्धा तालुका,विभाग व राज्यस्तरावर या तीन टप्यामध्ये आयोजीत केली जाणार आहे.
2.तालुकास्तरीय सर्व स्पर्धाचे आयोजन तालुका गट शिक्षणाधिकारी यांच्याकडे असेल.
3.पोर्स्टस बनवणे स्पर्धा नाव नोदणी करीता केंद्रप्रमुख यांच्या मार्फत गुगल लिंक देण्यात येईल.
4.केंद्रप्रमुख यांनी या स्पर्धा प्रकारा करीता त्याच्या केंद्रातुन एका शिक्षकांचे नाव संबंधीत स्पर्धच्या लिंकवर नोदवणे आवश्यक आहे.
5.प्रत्येक केंद्रातुन एक शिक्षक तालुकास्तरीय स्पर्धा या करीता पाठविणे अपेक्षित आहे.एकापैक्षा अधिक शिक्षक स्पर्धत सहभाग घेऊ इच्छीत असल्यास त्याच्या करीता केंद्र पातळीवर स्पर्धा राबुन सहभागी मधून सर्वकृष्ठ स्पर्धकाची निवड करावी.त्यासाठी मुल्याकंनाचा निकष म्हणून तालुका ते राज्य पातळीवरील निरधारीत करण्यात आलेले निकष परीक्षणासाठी वापरता येतील.
6.स्पर्धा निहाय सहभागी होणाऱ्या कर्मचारी/शिक्षकांची/अधिकाऱ्याची लेखी सहमती घ्यावी व स्पर्धच्या वेळी आयोजकाकडे हे समती पत्र सादर करावे.
7.तालुका स्तरावरील स्पर्धतील प्रथम क्रमाक प्राप्त विजेत्याची निवड विभागस्तर सहभागासाठी करण्यात येईल.
8.विभागस्तरावरील स्पर्धा आयोजनाची जबाबदारी ही संबंधीत उपसंचालक कार्यालय,प्राचार्य डायट,शिक्षणाधिकारी प्राथमिक,माध्यमिक यांची राहील.
9.विभागस्तरावर प्रथम पाच क्रमाकाच्या विजेत्याची निवड राज्यस्तरीय स्पर्धा सहभागासाठी करण्यात येईल.
10.**पोर्स्टस बनवणे** राज्यस्तरीय स्पर्धचे आयोजन जिल्हा परभणी डायट याच्याकडे असणार आहे.
11.राज्यस्तरावर प्रथम दहा विजेत्या स्पर्धकाची निवड अतिम करण्यात येईल.
12.विभागस्तरावरील प्रथम क्रमाकाच्या पाच विजेत्या स्पर्धकाची नावे संबंधीत विभागाने राज्यस्तरील स्पर्धा आयोजक परभणी जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेकडे 31/12/2025 पूर्वी पाठवावीत.
13.तालुकास्तरावरील स्पर्धा नोव्हेबर 2025 मधील चौथा शुक्रवार व शनिवार रोजी आयोजीत केल्या जातील.
14.विभागस्तरावरील स्पर्धा डीसेबर 2025 रोजी या महिन्यातील चौथा शुक्रवार व शनिवार रोजी आयोजीत केल्या जातील.
15.राज्यस्तरावरील अतिम स्पर्धा जानेवारी 2026 मधील चौथा शुक्रवार व शनिवार रोजी आयोजीत केल्या जातील.
16.सहभागी स्पर्धकानी तालुकास्तरावर स्पर्धत सहभागी होण्यासाठी स्वखर्चाने उपस्थित राहावे.
17.सर्व स्पर्धासाठी तालुकास्तरावर सहभाग घेणाऱ्या शिक्षक अधिकारी/कर्मचारी यांचे नाम निर्देशन गुगल फार्मद्वारे संकलीत केले जाणार आहे.हि लिंक केवळ केंद्रप्रमुख यांना पाठविली जाईल नाम निर्देशनाची प्रक्रीया 31 ऑक्टोबर 2025 पर्यत केंद्रप्रमुख यांनी पूर्ण करावयाची आहे.
18.सर्व जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था यांनी स्पर्धसाठी अनुभवी तज्ञ परीक्षक व स्पर्धा स्थळ यांची निवड करुन यादी अतिम करावी.

## पोस्टर स्पर्धक नियमावली व सूचना

1.पोस्टर स्पर्धकरीता हाप इंपिरीअल माउंट बोर्ड,ट्रेस पेपर व रफ कागद इत्यादी साहित्य स्वत: घेऊन यावे.
2.स्पर्धमध्ये दिलेल्या विषयापैकी कोणत्याही एका विषयावर पोस्टर तयार करावे.
3.रंग सगती विषयानुसार आसावी.
4.स्पर्धतुन कोणत्याही प्रकाच्या धार्मीक भावना दुखावणार नाही याची काळजी स्पर्धकानी घ्यावी.
5.पोस्टचे स्लोगन मराठी,इंग्रजी किंवा हिदी भाषेत असावे.
6.पोस्टर मधून देण्यात येणारा संदेश प्रेक्षकापर्यत सहज पोहोचला जावा.
7.पोस्टरकरीता पोस्टर कलर,अक्रॅनरक कना,ब्रश,रबर,पेन्सील इत्यादी साहित्य स्पर्धकांनी स्वत: आणावे.
8.स्पर्धाकरीता चार तासांचा वेळ देण्यात येइल.
9.परीक्षकांचा निर्णय अंतीम राहील.

**स्पर्धेचे मुल्यांकन**

| अ.क्र. | निकष | गुण |
|---|---|---|
| 1. | कल्पकता | 10 |
| 2. | रंगसंगती | 10 |
| 3. | मांडणी | 10 |
| 4. | सफाईदारपणा | 10 |
| 5. | एकुण प्रभाव | 10 |
| **एकुण गुण** | | **50** |

**स्पर्धेचा प्रकार**

| अ.क्र. | स्पर्धेचे नाव | वार व दिनांक |
|---|---|---|
| 1. | पोस्टर्स बनवणे | नोव्हेबर 2025(चौथा शुक्रवार,चौथा शनिवार) |

**स्पर्धेचे संभाव्य नियोजन**

| अ.क्र. | वार व दिनांक | स्पर्धेचे नाव | आयोजक जिल्हा | नोव्हेबर 2025 | डिसेबर 2025 | जानेवारी 2026 |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | तालुकास्तर | विभागस्तर | राज्यस्तर |
| 1. | चौथा शुक्रवार<br>चौथा शनिवार | पोस्टर्स बनवणे | परभणी | नोव्हेंबर 2025 अखेर पर्यत कॉलम 2 मधील दिवसापर्यत पूर्ण करावयाचे कामकाज (स्पर्धेतील एक विजेता निवडणे) | डिसेबर 2025 अखेर पर्यत कॉलम 2 मधील दिवसापर्यत पूर्ण करावयाचे कामकाज (स्पर्धेतील पाच विजेता निवडणे) | जानेवारी 2026 अखेर पर्यत कॉलम 2 मधील दिवसापर्यत पूर्ण करावयाचे कामकाज (स्पर्धेतील दहा विजेता निवडणे) |

**तालुकास्तर मुल्यांकन समितीची रचना पुढील प्रमाणे आसावी.**

1.गटशिक्षणाधिकारी

2.डायट समन्वयक अधिकारी

3.शिक्षक संघटना सदस्य

4.कला क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती

5.जेष्ठ विस्तार अधिकारी

**पोर्स्टर बनवणे साठी खर्च तरतुद**

प्रति तालुका 3000 प्रमाणे अदाजीत खर्च

Signed by Pralhad Sakharam Khune
Date: 28-10-2025 17:54:28

(**डॉ. प्रल्हाद खुणे**)
प्राचार्य
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, परभणी

**प्रत माहितीसाठी सविनय सादर-**

1.मा.संचालक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र,पुणे.
2.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद सर्व
3.मा.आयुक्त,महानगरपालिका सर्व
4.मा.विभागीय शिक्षण उपसंचालक सर्व